# जगणे सरळमार्गी असावे

अगदी सकाळी सकाळी माझ्या मोबाईलची मॅसेज ट्युन वाजली. मी लगबगीने माझ्या मोबाईलचा मॅसेज बॉक्स उघडला आणि तो आलेला मॅसेज वाचला. तो मॅसेज एकंदरीत असा होता " दुसऱ्याच्या डोक्यावर पाय ठेऊनंच काहीजण स्वतःच्या पायावर उभे राहतात. "मी तो मॅसेज वाचला आणि क्षणभर विचार केला कि, या जगात परमेश्वरानी प्रत्येकाच्या वाट्याला काही ना काही तरी दिलेलेच असते. जो चोच देतो तो दाणा सुध्दा देतो. मग एकाच्या वाट्याला आलेले दुसरा हिसकावून घेण्याचा प्रयत्न का करतो? इतरांना मिळणाऱ्या गोष्टीवर तुम्ही तुमचा हक्क कसं काय सांगू शकता? हा प्रश्न येथे अनुत्तीर्णच राहतो.

एक उदाहरण देता येईल कि, ज्यावेळी शाळेचा किंवा कॉलेजचा निकाल असतो, त्यावेळी अनेक विद्यार्थी स्वतःला किती मार्क्स पडले हे बघण्यापेक्षा मित्राला माझ्यापेक्षा मार्क्स कमी पडले कि जास्त हे पाहण्यासाठी तो अतुर असतो. माझ्या पेक्षा मित्राला कमी मार्क्स पडले तर खुश आणि जास्त पडले तर नाराज. पण असे का? त्याने वर्षभर अभ्यास केला म्हणून तो यशस्वी झाला. किंबहुना आपण कुठे चुकलो हे पाहण्यापेक्षा त्याला जास्त मार्क्स कसे पडले याच विचाराने तो बैचेन होतो.

मित्रांनो, हिच तर खरी आपल्या जगण्यामधील चुक आहे. दुसऱ्याचे यश का पचवू शकत नाही, त्याच्या आनंदामध्ये आपण का सामिल होवू शकत

नाही, हा विचार करणे आज गरजेचे आहे. आज कुठलेच क्षेत्र असे राहिले नाही कि, तिथे स्पर्धा होत नाही.

नोकरीसाठी स्पर्धा, व्यवसायात स्पर्धा, व्यक्तीगत जिवन जगताना स्पर्धा, पण या स्पर्धेत टिकतो तोच जो दुसऱ्याचे वाईट चिंतीत नाही. जो प्रामाणिकपणे आपल्या वाट्याला मिळालेले आनंदाने स्विकारतो, दुसऱ्याच्या आनंदामध्ये सामिल होतो. जो आपले कर्म प्रामाणिक पणे पार पाडतो, तोच या स्पर्धेला खडा उतरतो.

आज खरे पाहता प्रत्येकानेच आपले जीवण सरळ मार्गी जगले पाहिजे. दुसऱ्यांच्या आयुष्यामध्ये डोकावून त्याची उणी-धुणी काढण्याचा अधिकार तुम्ही कसे काय घेवू शकता. चर्चा हि वाईट गोष्टीची होत असते. माणसाला मनुष्य जन्म हा एकदाच मिळतो, चांगले कर्म इथेच घडते आणि वाईट कृती सुध्दा येथेच घडतात. त्यामुळे वाईट गोष्टीचे पाईक व्हायचे कि, चांगल्या हे सर्वस्वी आपल्याच हातामध्ये असते.

त्यामुळे जीवन जगत असताना एक गोष्ट नेहमी लक्षात ठेवा कि, कुणावर दोष ठेवीत बसू नका. विनाकारण कुणाची वाट अडवू नका, कुणाच्या प्रगतीच्या वाटेवर खिळे टाकीत बसू नका. फक्त आपले कर्म करीत रहा आणि दुस-यांच्या आनंदामध्ये सामील व्हा मग बघा जीवन किती सुदंर होईल.

# कार्यतत्परता - हाच यशाचा खरा मार्ग!

काम माणसाच्या जीवनातील अविभाज्य घटक आहे. प्रत्येजकण काही ना काही काम करतच असतो. जगण्यासाठी किंवा एखादे मोठं यश संपादन करण्यासाठी प्रत्येकाला कार्य करावेच लागते. एखाद्या ध्येयापर्यंत कोणी पोहचू शकला नाही तर त्याच्या कार्यात तो कमी पडला असे म्हटले तर काही चूकीचे ठरणार नाही. **"मोठी स्वप्ने पाहणारेच, मोठी स्वप्ने सत्यात उतरवतात.'** याप्रमाणे आपल्या यशाची पातळी कुठवर पोहचवायची आहे यावर कामाचे स्वरूप अवलंबून असते. एखादी गोष्ट वारंवार प्रयत्न करूनसुध्दा मिळत नसेल, तर मात्र त्या कामात सातत्य ठेवून, अपार कष्ट व श्रध्देने ते काम केले तर त्यामध्ये यश हे निश्चित मिळते.

ध्येयवादी माणसे नेहमी प्रगतीच्या मार्गावर दिसतात. याचे प्रमुख कारण म्हणजे, ध्येय साध्य करण्यासाठी ते सतत कार्यरत असतात. प्रत्येकांनी ध्येयावर श्रध्दा ठेवून कार्य करीत राहिले पाहिजे. श्रध्देपूर्वक केलेल्या कोणत्याही कामात यश हे निश्चितच मिळत असते. प्रत्येकजण ध्येय जरूर बाळगली पाहिजेत. पण त्याला जोड हवी ती प्रयत्नाची, जिद्दीची व अपार कष्टाची. तरच ती व्यक्ती त्या शिखरापर्यंत पोहचेल.

**'आपका हर सपना सच हो सकता है, अगर आप उसे पाने की हिम्मत रखते हो'** प्रत्येकाची काही ना काही स्वप्ने ही असतात. मग ती शिक्षणाबाबत, नोकरीबाबत किंवा व्यवसायाबाबत, त्या त्या क्षेत्रामध्ये सर्वोच्च स्थान प्राप्त करण्याची प्रत्येकाची इच्छा असते. पण यामध्ये बाधा

आणतात ते आपले नकारार्थी विचार. माझ्याजवळ काहीही नाही किंवा माझी बौध्दिक क्षमता कमी आहे, मी हे करू शकत नाही. अशा विचारामुळे आपण मागे राहतो.

एखाद्या व्यक्तीला व्यवसायात प्रगती करायची असेल. पण माझ्याजवळ तेवढे भांडवल उपलब्ध नाही असा विचार त्याच्या मनामध्ये आला कि तो काहीही करू शकत नाही. पण सतत काम करून, ध्येयवादी राहून, अपार कष्ट करून त्या व्यवसायात काम केले तर निश्चितच त्याचे ध्येय पूर्ण होईल. त्यामुळे असेल त्यातून नव-निर्माण करण्याची शक्ती प्रत्येकानी ठेवावी कामाबद्दल प्रेम, निष्ठा बाळगून ते काम केले पाहिजे. कोणतेही कठिण काम असो, त्याबद्दल निष्ठा ही बाळगली पाहिजे .त्या कामाला प्रामाणिकपणाने न्याय दिला पाहिजे. म्हणजे त्या कामात यश संपादन केल्याचा अभिमान मनास लाभेल.

श्रम ही देवता आहे. ज्याप्रमाणे आपण देव-देवताची पुजा करतो, त्याचप्रमाणे श्रमाला देवता मानून त्याची पुजा केली पाहिजे. मनुष्य जे काही मिळवतो, तो श्रमानेच. काम कुठलेही असो, त्या कामात सतत कार्यरत राहून त्याच्याबद्दल श्रध्दा, निष्ठा व प्रेम हे बाळगलेच पाहिजे. तरच आपण पाहिलेल्या ध्येयापर्यंत पोहचू शकू. सतत कार्यरत राहणे हे प्रगतीचे लक्षण मानले जाते. म्हणून तर या स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी आणि आपल्या क्षेत्रात सर्वोच्च स्थान मिळविण्यासाठी सदैव कार्यरत रहा. यश तुमचेच आहे.

# जे आहे ते स्विकारले पाहिजे.

मागील एक दोन दिवसामध्ये एका निवांत क्षणी वॉट्सॲपव्दारे आलेले इमेज मोबाईल वर पाहत बसलो होतो. त्यामध्ये बरेच सुंदर इमेज होते. त्या सर्व इमेजमध्ये एक सुदंर इमेज माझ्या नजरेखालून गेली. त्यामध्ये असे चित्र रेखाटण्यात आले होते कि, दोन माणसे सायकलवरुन जात आहेत. पुढे बसणाऱ्याला पाय नाहीत आणि मागे बसणा-याला हात नाहीत. हे चित्र पाहताना माझ्या डोक्यात असा विचार आला कि, अशा परिस्थितीमध्ये ते सायकल कसे काय चालवू शकतात.

पण अतिशय बारकाईने ते इमेज जेव्हा मी पाहिले तेव्हा मी सुध्दा थोडा स्थिरावलोच. कारण त्या इमेजमध्ये असे दाखविले होते की, ज्या माणसाला पाय नाहीत तो मनुष्य सायकलचे हॅण्डेल सांभाळण्याचे काम करीत होता व ज्याला हात नाहीत तो सायकलचे पॅडेल मारण्याचे काम करीत होता. त्यामुळे त्यांचा प्रवास सुखाचा चालू होता व त्यांची सायकल पुढे जात होती.

मित्रानो, हे चित्र आपणास बरेच काही सांगून जाते. पहा ना माझ्याकडे अमुक नाही, माझ्याकडे तमुक नाही, अशी विधाने करणाऱ्यांची संख्या आज समाजात भरपूर प्रमाणात आढळून येते. काय करायच्या अगोदरच आपल्याकडे काय कमी आहे याचाच हिशोब आपण करीत बसतो.

आपल्यातील कमीपणा आपणच आपल्यापुढे मांडून ठेवतो. त्यामुळे प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्याअगोदरच आपणाला संकटाचा डोंगर

समोर दिसू लागतो. नेमके हेच कारण आपल्या मनाच्या खच्चीकरणाला पुरेसे ठरते आणि आपल्या अदोगतीची सुरुवात होते. कुठल्याही परिस्थितीमध्ये आहे ते स्विकारायला शिकले पाहिजे.

आज समाजामध्ये जे लोक यशस्वी झाले ते काय आपल्याकडे असलेल्या कमी पणाला किंवा दु:खाला कवटाळून बसले नाहीत. प्रसंगी आपल्या जवळ जे आहे ते त्यांनी मान्य करुन त्यांचा स्विकार केला आणि नुसता स्विकार करुन ते थांबले नाहीत तर त्यांचा सुयोग्य उपयोग करुन ते यशस्वी झाले.

एका यशस्वी माणसाने खुप चांगले विधान केले आहे. ते असे की, "तुम्ही गरीब म्हणून जन्माला आलात तर त्यात तुमचा दोष नाही, परंतू गरीब म्हणून मेलात तर मात्र दोष तुमचा आहे "म्हणजे मनुष्याचे मोठेपण हे त्याच्या कष्टावरच अवलंबून असते.

जगातल्या प्रत्येकाकडे काही ना काहीची कमी असतेच अशी कोणताही व्यक्ती नाही की ती परीपूर्ण आहे. प्रत्येकाने आपल्याकडे जे नाही त्यापेक्षा आपल्याकडे जे आहे त्यांचा सदुपयोग करुन जीवन सुखी व यशस्वी बनविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. म्हणून तर परिस्थितीशी मिळते जुळते व्हा आणि येणाऱ्या प्रत्येक संकटाला तोंड देवून जे आहे ते स्विकारा आणि जीवन सुंदर बनवा.

# तत्वाशी नेहमी बांधील रहा

सदैव प्रतिक्षेत राहिल्यामुळे न मिळणाऱ्या गोष्टी पण मिळून जातात. जीवनामध्ये ज्या ज्या यशस्वी व्यक्तींबद्दल आपण वाचतो किंवा ऐकतो त्यांच्यामध्ये आपणास त्या व्यक्तीबद्दल त्याची व्यक्तीगत काही ना काही तत्वे आपणास दिसतात. ते यशस्वी झाले हे त्यांच्या तत्वामुळेच म्हणून तर जीवनामध्ये तत्वे किती महत्वाची आहेत आणि त्याच्याशी बांधील रहाणे यशस्वी होण्यासाठी आवश्यक असते.

जीवनामध्ये प्रत्येकाने स्वत:ची अशी काही तत्वे स्वीकारली पाहिजेत. आपण एखाद्या यशस्वी व्यक्तीची मुलाखत ऐकतो वा पाहतो. यामध्ये एक गोष्ट आपणास प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे त्या व्यक्तीने आपले संपूर्ण जीवन हे तत्वाशी बांधलेले असते. एखादा म्हणतो की, मी माझ्या तत्वाशी कधीही तडजोड करीत नाही. कारण त्या व्यक्तीला माहीत असते की जिथे तत्वाशी तडजोड तिथे आपली पिछे दौड होईल म्हणून तर तत्वावर आपले सगळे जीवन व्यथीत करणारी मंडळी होऊन गेली.

प्रत्येकाची तत्वे हि वेगवेगळी असतात. कुणाला फुकटाचे मिळालेले आवडत नाही, कुणी दुसऱ्याच्या वस्तूवर आपला हक्क सांगत नाही, कुणाला दुसऱ्याची उधारी जड वाटते, तर कुणाला आपल्या नशीबात मिळणाऱ्या गोष्टीतच आनंद मिळतो. अशी अनेक तत्वे प्रत्येकामध्ये काही प्रमाणात आढळतात.

तत्वाशी बांधील राहणे म्हणजे आपल्या मनावर विजय मिळविणे होय. असे म्हटल्यास काही वावगे ठरणार नाही. कारण अमुक या गोष्टीला

आपले मनच तयार होत नसेल तर आपण तत्वाशी बांधीलच राहिलो ना. उदा.एखाद्या अधिकाऱ्याने ठरविले की, माझ्या संपूर्ण नोकरीच्या कालावधीमध्ये मी कुठलाही पैसा गैर मार्गाने मिळवणार नाही .हे त्याचे एक तत्व झाले आणि खरच जर त्या व्यक्तीने आपली संपूर्ण कारकिर्द अशी सरळमार्गी केली तर ती व्यक्ती तत्वाशी बांधील राहिली.

तत्वनिष्ठ राहणे हि खरच सोपी गोष्ट नाही. यासाठी आपले मन तसे तयार केले पाहिजे. मला येथे एक वाक्य आठवते की, विजय सत्याचाच होतो. म्हणून तर खरे बोलणे हे सुद्धा तत्व अंगी बाळगले पाहिजे. नाही तर खोटे बोलून पोट भरण्यापेक्षा खरे बोलण्याच्या तत्वाशी एकनिष्ठ राहून सत्यवादी मनुष्य बनता येते.

कष्टाने मिळालेले कडेपर्यंत टिकते. एखादी घडणारी चांगली गोष्ट किंवा मिळणारी वस्तू हि आपण केलेल्या प्रामाणिक प्रयत्नावर अवलंबून असते. पण प्रामाणिक कष्ट करण्याचे तत्व हे अंगी लावून घ्या. जीवन हे तत्वावरच जगता येतं ते दु:खी जगायचं किंवा सुखी जगायचं हे मात्र आपल्या तत्वावर ठरतं. त्यामुळे नेहमी तत्वाशी बांधील रहा.

# मी पणा नकोच

समाजामध्ये वावरत असताना माझेच म्हणणे खरे असे म्हणणारे बरेचशे महाशय आढळतात. पण त्याच्या ध्यानात हे येतच नाही की, त्याच्या या आडमुठ्या विचारामुळे ते किती अडचणीमध्ये येतात ते बरेच जन याच वृत्तीमुळे मागे पडतात. मी म्हणेन तेच खरे, मीच खूप शहाणा, मलाच सर्व जमते अथवा येते, मीच हे काम करु शकतो अशा काही विचारांमुळे या महाशयाची काहीशी फसगत होते कारण हाच गुण त्याच्या यशातील एक खूप मोठा अडसर ठरतो.

मी पणा हा सर्वामध्ये अढळणारा एक गुण आहे. काहींमध्ये तो प्रमाणात असतो, पण काहीजण त्याचा अतिरेक करतात. मराठीमध्ये एक म्हण आहे. 'अति शहाणा त्याचा बैल रिकामा' ज्याच्यामध्ये मी पणाचा अतिरेक आहे असे लोक या म्हणीचे बळी पडतात. त्यामुळे मी पणा थोडासा टाळा.

सध्या युवकांना या गोष्टीची खूप गरज आहे. कारण मीपणाच्या भरात ते मुळ मार्गावरुन भरकटतात उदाहरणच द्यायचे झाले तर दहावी पास झालेल्या आपल्या पाल्यांला पालक सांगतात की तु आमुक या शाखेला प्रवेश घे पण मीपणाच्या आहारी गेलेल्या मुलाला ते पटत नाही तो मी पणाच्या भ्रमांत वेगळीच शाखा निवडतो. पण पुढे तो करिअरमध्ये अयशस्वी झाला तर मग सर्व खापर तो आईवडीलांच्यावर फोडतो. किंबहूना त्याच वेळी मीच शहाना किंवा मी पणा सोडून देऊन जर त्या मुलाने पालकांचे ऐकले असते तर तो करिअरमध्ये सेट झाला असता.

अनेकांचे या मीपणामुळे बरेचसे निर्णय चुकतात तेव्हा कोणताही निर्णय घेताना किंवा कोणत्याही गोष्टीची अंमलबजावणी करताना थोडा विचार करा, थोरा मोठ्यांचा विचार घ्या, भावनेच्या भरात मी सांगेन तेच किंवा मी म्हणेल तेच या विचारातून स्वत:ला मुक्त करा.

जीवन जगताना कोणाचा सल्ला आपणाला कोठे नेवून ठेवेल हे सांगता येत नाही. त्यामुळे कोणाला कमी लेखू नका. तो अज्ञानी आहे मि खूप शिकलो आहे या भ्रमात न राहता आपल्यापुढे कोणीतरी एक पाऊल पुढे आहे असा समज मनात निर्माण करुन जीवन जगा मग पहा मीपणाला तुम्ही पूर्ण विसराल आणि बनाल एक सुजान नागरिक.

# जे करेन ते मनापासूनच

**‘आपका हर सपना सच हो सकता है, अगर आप उसे पाने की हिम्मत रखते है’** वरील वाक्यामध्ये जीवनाबद्दल सर्व काही दडलेले आहे. पहा ना एखादे छोटसं पाखरू ज्यावेळेस घरटे बांधत असते, त्यावेळी आजुबाजूच्या वातावरणाचा त्याला खूप त्रास होतो. वाऱ्यामुळे बांधलेले घरटे एखाद्या वेळेस तुटून पडते किंवा पावसामुळे घरटे पाण्याच्या प्रवाहाबरोबर वाहून जाते. पण अशा परिस्थितीमध्ये पाखरू घरटे बांधायचे सोडत नाही तर नव्या उमेदीने किंवा संपूर्ण ताकदीने ते घरटे बांधते.

पाखराचे घरट्यासाठी चाललेला संघर्ष आपण पाहिला असेलच, मग आपण हे सर्व समजून न समजल्यासारखे व पाहून न पाहिल्यासारखे का वागतो? जर पशु-पक्षांच्यामध्ये एवढा आत्मविश्वास असेल तर आपण मनुष्य आहे. आपण एखाद्या गोष्टीसाठी मनापासून प्रयत्न का करीत नाही? एकदा अपयश आले म्हणजे आपण ते करूच शकणार नाही हा विचार आपण आपल्या मनातून कधी काढून टाकणार आहोत. जे करेन ते मनापासून करेन ही भावना मनात बिंबवण्याची आज खरी गरज निर्माण झालेली आहे. जीवनामध्ये शॉर्टकटचा मार्ग आपण पूर्णपणे टाळला पाहिजे. तरच त्या कामाची किंमत आपणांस समजेल.

‘प्रतिभाशाली व्यक्ती एक प्रतिशत प्रेरणा और निन्यानवे प्रतिशत पसीने से बनता है’ विद्युत बल्बचा शोध लावणारे थॉमस अल्वा एडीसन हे विद्युत बल्बच्या प्रयोगामध्ये कित्येकदा अयशस्वी झाले. पण बऱ्याचवेळा प्रयोगाअंती विद्युत बल्बचा प्रयोग ते यशस्वी केले.

खूपवेळा प्रयत्न करुनसुध्दा तो प्रयोग यशस्वी न झाल्यामुळे ते त्याच्यापासून दुरावले नाहीत तर ते काम ते मनापासून, जिद्दीपूर्वक केले. त्यामुळे त्यांना ते यश मिळाले. असे अनेक लोक होऊन गेले की, त्याच्या मनापासून काम करण्याच्या चांगल्या गुणामुळे ते यशस्वी झाले.

विद्यार्थ्यांनीसुध्दा एक विचार मनामध्ये नेहमी ठेवावा की, जे करेन ते मनापासून करेन. एखाद्या डिग्रीसाठी अॅडमिशन न मिळाल्यामुळे किंवा डिग्री मिळून सुध्दा नोकरी न मिळाल्यामुळे निराश न होता. व्यवसाय किंवा अन्य क्षेत्रात अगदी मनापासून काम करत गेल्यास यश तुमचेच आहे. मनापासून केलेल्या कामाचे फायदे भरपूर होतात. एखाद्या ऑफिसमधील लिपिकाने करायचे म्हणून काम केल्यास त्याला त्यामध्ये समाधान मिळणार नाही. पण त्यामध्ये काही नाविन्यता आणून ते काम मनापासून केल्यास त्याचे समाधान त्याला नक्कीच मिळेल. कोणतीही गोष्ट मनापासून करणारे लोक हे नेहमी यशस्वीपणाकडे झुकलेले असतात. त्यांच्या यशाचे गमक हेच आहे की, फक्त मनापासून काम आणि काम.

अभिनय क्षेत्रातील कार्य हे असेच असते. त्या क्षेत्रामध्ये अभिनेत्याच्या कामाबाबत खरा कस लागलेला असतो. आपल्या अभिनयाने समोरच्या व्यक्तीला हसविणे, रडविणे, प्रसंगी दुःखी करण्याचे काम ते आपल्या अभिनयाच्या सहाय्याने करीत असतात. तुम्ही कुठल्याही क्षेत्रात काम करा, कुठलेही उच्च शिक्षण घ्या. पण ज्या क्षेत्रामध्ये तुम्ही काम करणार आहात तेथे काम मात्र मनापासून करा. मग पहा, त्या कामाबाबतचा एक समाधानपणा तुम्हाला किती आनंद देवून जातो तो.

# निर्णय क्षमता महत्त्वाची

निर्णय मनुष्याच्या जीवनातील एक महत्त्वपूर्ण घटक आहे. माणूस जे काही मिळवतो व जे काही गमवतो ते त्यांच्या निर्णयावर अवलंबून असते. प्रत्येकाला निर्णय घेण्याचा अधिकार असतो. अन् तो सर्वस्वी त्याचाच असतो. बऱ्याच अंशी असे निदर्शनास येते की, निर्णय क्षमता कमी असणाऱ्या व्यक्ती आजूबाजूच्या परिस्थितीवर अवलंबून असतात. जशी परिस्थिती बदलेल तशी त्याची निर्णय क्षमता बदलत असते. अशा कृतीमुळे तो इतरत्र भरकटत आहे, याची जाणीव त्याला होत नसते. अशा परिस्थितीमुळे अनेकांना यशापासून दूर होण्याची वेळ येते.

निर्णय ही एक महत्त्वपूर्ण क्षमता आहे. निर्णय क्षमतेचे कौशल्य ज्यांनी आपल्या अंगी विकसित केले आहे, ते आपल्या कार्यापासून विचलित होत नाहीत. निर्णय क्षमतेचे कौशल्य आत्मसात करण्यापूर्वी प्रत्येकाने दूरदृष्टी बाळगली पाहिजे. दूरदृष्टी ठेवून घेतलेले निर्णय नेहमी यशस्वी होतात. आपण घेतलेल्या निर्णयाचे होणारे चांगले-वाईट परिणाम सहन करण्याची शक्ती आपल्या मनामध्ये तयार करावी. म्हणजे पुढील निर्णयावेळी आपल्या मनाची द्विधावस्था निर्माण होणार नाही. निर्णयामुळे झालेले परिणाम पचविण्याची ताकद आपल्यामध्ये नेहमी ठेवावी.

निर्णयाच्या बाबतीत असे म्हटले जाते की, वेळेत घेतलेल्या निर्णयाचा फायदा नक्कीच होत असतो. काही निर्णय वेळेच्या बाहेर जाऊन घेतले

जातात. यामुळे साध्य करण्याची गोष्टच राहून जाते. त्यामुळे निर्णय क्षमतेमध्ये वेळेला खूप महत्त्व आहे. ते नेहमीच लाभदायक असतात.

लहानपणी आपण आई-वडीलांकडे विशिष्ट गोष्टींसाठी हट्ट धरायचो. खऱ्या अर्थाने तीच वेळ असते की मुलामध्ये निर्णय क्षमता बिंबवण्याची. पण तसे न घडता आई-वडील मुलाच्या मनावर निर्णयाबाबतीत अनेक बंधने लादतात. अशा वागणुकीमुळे लहानपणापासूनच मुलाची निर्णय क्षमता खुंटते. या सवयीमुळेच तो निर्णय क्षमतेपासून दूर राहतो.

वडिलधाऱ्या माणसांनी, मुलांनी घेतलेल्या निर्णयाला प्रोत्साहन दिले पाहिजे, तरच मुलांमध्ये निर्णय क्षमता रुजली जाईल. आपल्या पाल्याने एखादा निर्णय चुकीचा घेतला असेल, तर त्याला विश्वासात घेऊन त्याच्या निर्णय क्षमतेला बळकटी दिली पाहिजे. तरच तो पुढील निर्णय घेण्यास तयार होईल. पालकांनी मुलाच्या निर्णय क्षमतेला वाव दिला पाहिजे.

निर्णय क्षमता ही व्यक्तीच्या क्षमतेवर आधारित आहे. व्यक्तीची दूरदृष्टी व वैचारिक क्षमता यावर सुध्दा ती अवलंबून असते. निर्णय घेताना त्या निर्णयामुळे होणारे बदल, परिणाम, फायदे, तोटे या सर्वांची गोळा-बेरीज करून निर्णय घेतले पाहिजे म्हणजे अंगी निर्णय क्षमता रूजण्यास मदत होईल.

आपण घेतलेल्या निर्णयाचा पाठपुरावा भविष्यात आपणच करत असतो. म्हणजे घाई गडबडीत घेतलेला एखादा निर्णय हा आपणाला अडचणीत

आणत असतो. त्या निर्णयाचे परिणाम आपणास भोगावे लागतात. त्यामुळे निर्णय घेताना घाई गडबडीने निर्णय घेऊ नये.

निर्णय क्षमतेमध्ये आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे आपल्या निर्णयासंबंधी इतरांची मते आजमावून घेणे. यामुळे आपल्या निर्णयाचे मूल्यमापन आपल्याला करता येते. या माध्यमातून आपला निर्णय बरोबर आहे की, चुकीचा हे ठरविणे सोपे होईल. आपल्या मनाचा कल निर्णयाकडे जाण्याची सकारात्मकता दाखवितो आहे की नाही हे पडताळून पाहण्याची गरज निर्णय क्षमतेमध्ये महत्त्वाची आहे. निर्णयामुळेच आपल्या आयुष्याला कलाटणी मिळत असते. प्रत्येकाचे वैयक्तिक जीवन त्याच्या्या निर्णय क्षमतेवरच अवलंबून असते. निर्णयामुळेच प्रत्येकाला सुखव दुःखाला सामोरे जावे लागते.

सामाजिक जीवन जगत असताना घेतलेल्या निर्णयावरच आपली वाटचाल ठरत असते. निर्णय क्षमतेमध्ये एवढी मोठी ताकद आहे की, निर्णयामुळेच आपले वैयक्तिक जीवन, सामाजिक आयुष्य व मानवजातीचे भविष्य हे व्यक्तीच्या निर्णय क्षमतेवर अवलंबून असते. म्हणून तर निर्णय क्षमतेचे कौशल्य अंगी रुजवा व निर्णयक्षम मनुष्य बना.

# जबाबदारी घेण्यासाठी सदैव तयार रहा

मित्रहो, आपण बऱ्याच वेळा असे ऐकतो की, अमुक याने ती जबाबदारी नाकारली, किंवा शासकीय कार्यालयामधील एखादे महत्त्वाचे व जबाबदारीचे पद आपल्या माथी येणार असे वाटल्याने स्वेच्छानिवृत्ती घ्यायची हे बऱ्याचवेळा आपण ऐकतो किंवा पाहतो. अशा कामामधून माघार घेणे म्हणजे जबाबदारी न स्विकारणे होय.

तुम्हाला आठवत असेल की, शालेय जीवनात असताना वर्ग सजावटीची वर्गणी एकत्र करण्याचे काम कोण करणार असे शिक्षकांनी विचारताच फक्त एक-दोन जणांचे हात वर यायचे. पण बाकीचे मात्र हा विचार करायचे की कशाला उगाच डोक्याला ताप. पण जे हात वर करायचे ते मात्र शिक्षकाच्या विश्वासाला पात्र व्हायचे. वर्गातील पुढचे कोणतेही काम असो, शिक्षक त्यानांच सांगायचे. कारण त्या विद्यार्थ्यांच्यामध्ये जबाबदारी घेण्याची व समर्थपणे पेलण्याची जिद्द असते, असेच लोक जीवनात नेहमी अग्रेसर असतात आणि यशाला गवसणी घालतात. जीवन जगत असताना 'आपली काहीतरी जबाबदारी आहे' या भूमिकेतूनच जीवन जगले पाहिजे. मग ती जबाबदारी कामाच्या ठिकाणची असो, घरगुती असो, किंवा सामाजिक कारण. तुम्ही जेवढे जास्त जबाबदारी घेण्यासाठी पुढे येता तितके तुम्ही लोकांचे विश्वसनीय बनता.

जबाबदारी ही तुम्हाला सिध्द करण्याची फार मोठी संधी आहे. पहा ना एखाद्या कंपनीतील उच्च पदस्थ अधिकारी जेव्हा रजेवर जातो किंवा

काही कारणास्तव नोकरी सोडतो, तेव्हा त्या परिस्थितीत त्यांचे काम एका दुसऱ्या व्यक्तीकडे देण्यात येते. ती व्यक्ती ते काम व्यवस्थितपणे व जबाबदारीने जेव्हा पार पाडते तेव्हा त्या कामासाठी किंवा पदासाठी सिध्द होते. पण हे कधी तर त्यांना मिळालेल्या संधीमुळे. म्हणून नेहमी लक्षात ठेवा जीवनात जबाबदारीची संधी आली तर मागे हटू नका किंवा जबाबदारी झटकू नका. किंबहुना ती स्विकारा व स्वतःला सिध्द करा.

एखाद्या गोष्टीसाठी आपण अविरत प्रयत्न करून सुध्दा ती गोष्ट आपणास मिळत नाही याचे खरे कारण असे सुध्दा असू शकते की, आपण ती गोष्ट जबाबदारीनिशी करत नाही .उदा .एखाद्या विद्यार्थ्याला परीक्षेत भरपूर मार्कस् हवे आहेत, पण त्याची अभ्यासाची पध्दत चुकीची असेल तर त्याला हवे ते गुण मिळणार नाहीत. किंबहुना, आई-वडीलांनी आपल्यावर ती जबाबदारी टाकलेली आहे की, परीक्षेत अभ्यास करुन भरपूर गुण प्राप्त करण्याची त्या जबाबदारीची जाणीव ठेवून तो विद्यार्थी चांगला व जबाबदारीने अभ्यास केल्यास त्याला नक्की यश मिळेल.

जबाबदारीसाठी सदैव तयार असणे म्हणजे आपली कार्यतत्परता तडीस नेणे होय. एखादा मनुष्य सर्वच जबाबदारी आवडीने घेत असेल तर तो त्याचा एक प्रकारचा छंदच म्हणता येईल. पण या छंदाचा फायदा मात्र त्याला आयुष्यामध्ये खूप होतो. एक जबाबदार व्यक्ती म्हणून समाज त्याच्याकडे पाहतो. 'जबाबदार व्यक्ती' ही उपमा प्रत्येकाच्या नशिबी असतेच असे नाही. ती जर मिळवायची असेल तर जबाबदारीसाठी सदैव तयार रहायला हवे. आज खरे तर तरुण वर्गाने जबाबदारीचे महत्त्व

पटवून घेण्याची गरज निर्माण झालेली आहे. जीवन जगताना प्रत्येक ठिकाणी जबाबदारी ही घ्यावीच लागते.

टीम वर्कमध्ये जबाबदारीला खूप महत्त्व असते. टीमवर्कमध्ये प्रत्येकावर जबाबदारी दिलेली असते आणि प्रत्येकजण त्या जबाबदारीप्रमाणे आचरण करीत असतो. त्यामुळे संबंधित एखादा हेतू किंवा काम पूर्णत्वास जाते. त्यामुळे कोणतेही काम तडीस नेण्याचे जबाबदापणा एक माध्यम आहे. तर जबाबदारीचे महत्त्व पटवून घ्या व जीवनात जबाबदारी घेण्यासाठी सदैव तयार रहा आणि दुसऱ्या प्रति आपली विश्वासार्हता साध्य करा व स्वतःला सिध्द करुन दाखवा.

# सन्मानपूर्वक वागणे हवे

करिअर करित असताना वा त्यामध्ये यश संपादन करताना आणि स्वत:ची एक ओळख निर्माण करताना काही तरूण मी इतरांपेक्षा समाजात वेगळा आहे अशा अविर्भावात वावरताना आपणास दिसतात. पण स्वत:ची ओळख निर्माण झाल्यावर आपण सुद्धा माणूस आहोत आणि इतरांसोबत माणुसकीने वागले पाहिजे हे तो विसरतचं जातो. आज युवकांनी समाजामध्ये वावरताना भान ठेवून इतरांशी सन्मानपूर्वक वागले पाहिजे.

एका बर्फाच्या कारख्यान्यामध्ये काम करणाऱ्या व्यक्तीची ही गोष्ट आहे. कामाची वेळ संपत आली होती, सगळे घरी जाण्याच्या तयारीत होते. तेवढ्यात कारखान्यामध्ये थोडा तांत्रिक बिघाड झाला म्हणून तो कामगार तो बिघाड दुरूस्त करण्यासाठी कारखान्यामध्ये गेला. तो बिघाड दुरूस्त करण्यास त्याला बराच वेळ लागला. तो पर्यंत तो प्लांन्ट बंद झाला. सर्व लाईट बंद करून कारखान्याचे दरवाजे बंद करण्यात आले. अशा परिस्थितीत बर्फ आणि थंडीने त्या कामगाराचा जीव जाणे निश्चित होते. त्या कामगाराला काही सुचेना. पण तेथे एक चमत्कार घडला तो असा की, त्या कारखान्यात एक सुरक्षारक्षक हातामध्ये बॅटरी घेऊन उभा होता. त्याने त्या कामगारास बाहेर काढून त्याचा जीव वाचविला.

थोड्या कालावधीनंतर त्या कामगाराने त्या सुरक्षारक्षकाला विचारले की, तुम्हाला कसे कळाले की मी आतमध्ये अडकलो आहे. त्यावर सुरक्षा

रक्षकाने स्मित हास्य करीत त्या कामगाराला म्हणाले की, या कारखान्यामध्ये काम करणाऱ्यांमध्ये तुम्ही एकमेव व्यक्ती आहात की, सकाळी कारखान्यात जाताना मला रोज नमस्कार व घरी जाताना राम राम म्हणता. आज सकाळी नमस्कार करून तुम्ही आत गेला पण घरी जाणाऱ्या इतर लोकांमध्ये तुम्ही दिसलाच नाही. मला शंका आली म्हणून मी पाहण्यासाठी कारखान्यामध्ये आत आलो.

त्या कामगाराला कधी वाटले देखील नव्हते की, एखाद्याचा एवढा छोटा सन्मान देणे एक दिवस त्याचा जीव वाचवेल. जीवनामध्ये एक गोष्ट नेहमी लक्षात ठेवा की, कोणी लहान-मोठा नसतो. त्यामुळे सर्वांसोबत माणुसकीने वागले पाहिजे. पैसे काय आज येतो-जातो. पण माणुसकी ही शेवटपर्यंत टिकते. आज समाजामध्ये या गोष्टीची खूप गरज आहे एकमेकाला आदर देणे, दुसऱ्याचा सन्मान करणे या गोष्टी स्वत:मध्ये आत्मसात करा. कदाचीत तुमच्या आयुष्यामध्ये असाच एक सुरक्षा रक्षक कधीतरी येईल. माणुसकीच तुम्हाला शेवट पर्यंत साथ देईल म्हणून सर्वांबरोबर माणुसकीने आणि सन्मानपूर्वक वागा.

# महत्त्व ‘बहुमोल वेळेचे’

वेळ ही कोणासाठी थांबत नसते. एकदा गेलेली वेळ कधीच परत येत नाही. इंग्रजी मधील ‘टाईम इज मनी’ म्हणीप्रमाणे वेळेची तुलना पैशांबरोबर केलेली आहे. त्यामुळे आपल्या जीवनामध्ये वेळेला किती महत्त्व आहे हे दिसते. ठरविलेले काम वेळेत पूर्ण व्हावे असे आपणास वाटत असेल तर वेळेला महत्त्व दिलेच पाहिजे. आपली वाटचाल जो वेळेनुसार करतो तो यशाच्या शिखरापर्यंत नक्कीच पोहचतो. त्यामुळे यश प्राप्त करायचे असेल, तर वेळेचे महत्त्व व वेळेचे नियोजन आपण जाणलेच पाहिजे .वेळेचे सुयोग्य नियोजन करण्यासाठी पुढील मार्गदर्शक सूचना उपयोगी पडतात.

**(1आठवड्यातील कामाची यादी करा -** जी कामे आपल्याला पुढील आठवड्यात पूर्ण करावयाची आहेत. त्याची एक यादी तयार करा. प्रत्येक कामासाठी विशिष्ट वेळ ठरवा. ते काम ठरलेल्या वेळेमध्ये कसे पूर्ण करता येईल. याच्याकडे कटाकक्षाने लक्ष द्या. अशाने तुमची वेळेवर पकड निर्माण होईल. प्रत्येक काम अगदी सुलभ रित्या पूर्ण होईल.

**2) ठरलेली कामे रोजच्या रोज व वेळेत पूर्ण करण्याचा प्रयत्न करा -** आपण जी आठवड्यामध्ये कामाची आखणी केलेली आहे. त्यामधील त्या दिवसाची कामे त्याच दिवशी पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. म्हणजे ‘आजचे काम आज’ अशामुळे तुम्हाला पुढच्या कामाचे दडपण येणार नाही व पुढची कामे सुरळीत होण्यास मदत होईल.

**3) वेळेचा अपव्यय टाळा -** जीवनामध्ये आपला बराचसा वेळ वाया जात असतो. त्याची कल्पना आपणाला सहजासहजी येत नाही. वेळेचा अपव्यय टाळणे हे आपल्या हातात असते. रिकाम्या वेळेमध्ये आपण जो टाईमपास करतो तो शक्यतो टाळा म्हणजे वेळेचा अपव्यय होणार नाही व असा रिकामा वेळ चांगल्या कामासाठी खर्च होईल.

**4) वाया जाणाऱ्या वेळेचा सदुपयोग करा -** कामामध्ये जाणारा वेळ सोडला तर प्रत्येकाला थोडासा तरी रिकामा वेळ मिळतच असतो. अशा वेळेचा उपयोग कोणी करून घेत नाही. असे न करता त्या वेळेचा चांगल्या कामासाठी उपयोग करून घेतला पाहिजे. जेणेकरून रिकाम्या जाणाऱ्या वेळेचा सदुपयोग होईल.

**5) एखादा छंद जोपासा -** प्रत्येकाकडे एखादा छंद असणे आवश्यक आहे. छंदामुळे जीवन सुखी बनते. 'रिकामे डोके सैतानाचे घर' या म्हणीप्रमाणे आपणास काही काम नसेल तर डोक्यात अनेक अत्यावश्यक विचार येतात. त्यामुळे असा वेळ छंदामध्ये घालवला तर त्याचा फायदा नक्कीच होईल. वरील प्रत्येक गोष्टीचा बारकाईने विचार करा. या प्रत्येक गोष्टी आपल्या आचरणात आणण्याचा प्रयत्न करा. अशा वर्तनामुळे आपणास वेळेचे महत्त्व समजेल. वेळ ही किती बहुमोल गोष्ट आहे याचा परिचय होईल.

# बोलून विचार करण्यापेक्षा...

स्पष्ट बोला पण ते असे बोला की, ज्यामुळे समोरच्याला दुःख होणार नाही व तुमचे असलेले नाते नष्ट होणार नाही. माणसाची वाणी जर चांगली असेल तर ती व्यक्ती समाजामध्ये एक आदर्श व्यक्ती म्हणून नावारुपास येते. समाजातील लोकांचा त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोण हा वेगळा असतो. जी व्यक्ती इतरांना कधीही वाईट बोलत नाही, कधीही कुणाची निंदा करीत नाही, त्याच्या माघारी त्याची उनीधुनी काढीत नाही, ती व्यक्ती खरोखरच समाजप्रिय व्यक्ती असते.

आज काल समाजामध्ये एकमेकांना समजावून घेण्याची प्रक्रियाच थंडावलेली आहे. एखादया बददल जर का कोणी काही सांगत सुटले तर त्याची शहानिशा न करता काही लोक त्या व्यक्तीवर काही अपगोष्टीचा ठपका ठेवतात. आणि सरळ सरळ त्या व्यक्तीला त्या संबंधी बोलतात. पण ज्या वेळेस त्या व्यक्ती बददल सत्यता समाजासमोर येते तेव्हा बडबडणा-या लोकांना त्याचा पश्चाताप होतो.

अरे !आपण त्या व्यक्तीला असे बोलावयास नको होते. खरे काय आणि खोटे काय याचा जरासुध्दा विचार न करता मि त्यांना बोललो हे चुकीचे झाले याच विचारात ती व्यक्ती गुरफटते. त्याचे मन त्याला आतुन खात रहाते. सगळी वेळ निघुन गेल्या नंतर त्याला त्याच्या चुकीची जाणीव होते. म्हणून जर नाते टिकवून ठेवायचे असेल तर बोलून विचार करण्यापेक्षा विचार करुन बोललेले कधीही चांगले.

बोलून विचार करीत बसण्याची वृत्ती ही तरुण वर्गात प्रामुख्याने जास्त प्रमाणात आढळून येते. आपण काय बोलले पाहिजे, कशा पध्दतीने बोलले पाहिजे, याचे जराही भान नसणारा एक नवा वर्ग उदयास आलेला आहे. घरामध्ये वावरताना पालकांनी आपल्या पाल्याला काही सुचना केली तर आपसुक तो पाल्य आपल्या वडीलांना ओरडतो. मी हे करणार नाही, मला त्या कामाची लाज वाटते, आता माझे हे वय आहे का? वैगेरे वैगरे पण ज्या वेळी त्याला पटते की, आपल्या वडीलांचे बरोबर होते पण त्यावेळी सगळी वेळ निघुन गेलेली असते.

पश्चातापाशिवाय त्याच्याकडे काहीही उरत नाही. म्हणून विचार व बोलणे यातील अंतर ओळखा. आपल्या सुंदर वाणीने जग जिंकता येते. पण त्याला जोड लागते ती चांगल्या विचारांची. त्यामुळे नेहमी बोलताना विचारपूर्वक बोला. व बोलून विचार करण्यापेक्षा विचार करुनच बोला. व समाजप्रिय व्यक्ती बना.

# अनुभव एक सर्वश्रेष्ठ शिक्षक

मराठीमध्ये एक वाक्य प्रचलित आहे, 'कोण आईच्या पोटातून शिकून येतो का?' खरचं, खऱ्या अर्थाने मनुष्य जन्माला आला की त्याचे शिकणे चालू होते. त्याची सुरुवात त्याच्या घरापासून होते. मुल जन्मले म्हणजे घरातील वडील, आई हे आपल्या बाळाला खूप साऱ्या गोष्टी शिकवित असतात. यातूनच त्याच्या आयुष्याची जडण-घडण सुरू होते.

'गुरुविना कोण दाखविल वाट' यानुसार जीवन जगत असताना आपण बऱ्याच गोष्टी शिकत असतो. शिकण्याच्या प्रक्रियेमध्ये महत्त्वाची भूमिका सांभाळणारे हे गुरू असतात. 'गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः। गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः॥ गुरूला परमेश्वर ठायी पाहिल्यामुळे गुरुच आपल्या जीवनाला कलाटणी देत असतात. म्हणून तर गुरुच्या आज्ञामध्ये जो मनुष्य असतो, तो कधीही चुकीचा मार्ग धरत नाही.

मनुष्य जे काही चांगल्या गोष्टी शिकतो किंवा हातून नकळत घडलेल्या चुका सुधारतो तो त्याच्या अनुभवानेच. आपण बऱ्याच वेळा पाहतो, लहान मूल हे खेळत खेळत एखाद्या गरम वस्तूपर्यंत जाते. आपण लगेच त्याला त्यापासून दूर करतो. यामध्ये त्या मुलाचा काहीच दोष नसतो. कारण ते अजाण असते. पण काही वेळेस त्याला सांगणारे किंवा त्या वस्तुपासून दूर नेणारे तेथे नसतात. ज्यावेळेस ते मूल त्या वस्तुपर्यंत जाऊन त्याला स्पर्श करते. त्यावेळेस त्याला मोठी इजा होते. या घटनेमुळे परत ते मूल त्या दिशेला जात सुध्दा नाही .

हे सारे घडते ते अनुभवामुळेच. कारण त्याला मागचा अनुभव माहित असल्यामुळे ते परत त्या दिशेला वळत सुध्दा नाही. हीच स्थिती आपल्या जीवनाची असते. आयुष्यामध्ये अनेक गोष्टींना आपणास सामोरे जावे लागते. मग त्या घटना वाईट असोत किंवा चांगल्या. खरे तर वाईट घटनामधूनच मनुष्य जीवन जगण्यास शिकतो. कारण वाईट घटनामधून वाईट अनुभव आल्यामुळे किंवा चांगल्या घटनामधून चांगले अनुभव आल्यामुळे तो जीवनाची वाट चालत असतो. बऱ्याच गोष्टी एकमेकांना देता येतात. पण 'अनुभव' ही एक अशी गोष्ट आहे की, ती आपण मिळविल्याशिवाय मिळत नाही. म्हणून तर अनुभव हीच आपल्या जीवनाची खरी शिदोरी ठरते. जीवनामध्ये अनेक माणसे त्यांच्या अनुभवामुळेच प्रगतीपथावर गेली. अनुभव माणसाला सर्व काही शिकवितो. म्हणून तर अनुभव हा सर्वश्रेष्ठ शिक्षक म्हणता येईल.

स्वामी विवेकानंद यांनी असे म्हटले आहे की, चांगल्या जीवनाचे रहस्य मजा करण्यात नसून अनुभवातून शिकण्यात आहे. खरचं किती सुंदर वाक्य आहे अनुभवातून शिकत गेल्यास जगणे खूप सुंदर होईल. त्यामुळेच अनुभवाला सर्वश्रेष्ठ शिक्षक माना व चांगल्या चांगल्या गोष्टी शिकून अनुभव संपन्न बना.

# नव्याने सुरवात करतांना.....

जीवनामध्ये काहीतरी नव्याने सुरवात करण्याची संधी ही प्रत्येकाला कधी ना कधी मिळतच असते. अपयशाने खचून गेलेल्या प्रत्येक माणसाच्या मनात नव्याने काहीतरी सुरवात करण्याची आशा थोडीफार दडलेली असते. अनेकदा तो तसा प्रयत्न सुध्दा करतो. पण काही कारणामुळे किंवा आजुबाजूच्या परिस्थितीमुळे त्याला ते शक्य होत नाही. नेमक्या याच कारणामुळे त्याला नव्याने काहीतरी सुरुवात करण्याच्या संधीपासून दूर जावे लागते. याचे उदाहरणच घ्यायचे झाले तर प्रचंड आत्मविश्वासाने व्यवसायात उतरलेला एखादा मनुष्य यशस्वी झाला नाही तर तो परत व्यवसाय क्षेत्राकडे चुकूनसुध्दा वळत नाही. खरं तर हीच गोष्ट त्याला पुढील वाटचालीसाठी बाधक ठरते. असा मनुष्य जीवनात कुठल्याच क्षेत्रात यशस्वी झाला नाही. तर मात्र त्याचा जगण्यावरचा विश्वास उडून त्याचे जीवन त्याला निरर्थक वाटते.

नव्याने सुरवात करणारा प्रत्येक मनुष्य हा त्या क्षेत्रामध्ये नवीनच असतो. त्यामुळे संबंधीत क्षेत्रातील खाचा-खोचा त्याला माहित नसतात. नंतर त्याच माणसाचा त्या क्षेत्रात हातखंडा निर्माण होतो. आपण नव्याने सुरवात करण्यासाठी उपयोगी पडणा-या खालील बाबी पाहुयात.

प्रत्येक गोष्टींला आत्मविश्वासाने सामोरे जा. जेव्हा जेव्हा संधी येते, तेव्हा आत्मविश्वासाने त्याला सामोरे जा. मी यामध्ये यशस्वी होणारच या हेतुनेच नव्याने सुरुवात करा. साध्य न होणाऱ्या गोष्टीसुध्दा

आत्मविश्वासाने साध्य होतात. त्यामुळे नेहमी अंगी आत्मविश्वास बाळगून आपली वाटचाल ठेवा. नक्की यशाचा मार्ग सापडेल.

**भूतकाळ विसरा -** जीवन जगत असताना आपणांस अशी अनेक माणसे आढळतात की, जी आपल्या भूतकाळाला कवटाळून बसलेली दिसतात. काहीतरी नवे घडवूया अशी जेव्हा त्यांची इच्छा होते. तेव्हा त्यांचा भूतकाळ आडवा येतो. मागे जे घडले तसेच होईल का? या विचारामुळे तो अपयशी होतो. त्यामुळे भूतकाळ विसरा आणि पुढे वाटचाल ठेवा.

**सकारात्मक विचाराने सदैव प्रेरित रहा -** विचार बदला, जीवन बदलेल याप्रमाणे आपल्या एका विचारात जग बदलण्याची ताकद असते. म्हणून तर 'वाल्याचा वाल्मिकी' झाला. नेहमी आपले विचार सकारात्मक ठेवा. सकारात्मक विचाराने त्या कामाबाबत इच्छाशक्ती निर्माण होते आणि त्यामध्ये यश आपोआपच मिळते. म्हणून सकारात्मक विचार नेहमी स्वतःजवळ ठेवा.

**सदैव कर्तव्यदक्ष रहा -** कोणतेही कार्य करत असताना ते आपले कर्तव्य राहणार आहे असे समजून कार्य करा. कर्तव्यनिष्ठ राहणारा मनुष्य यशापासून कधीच दूर नसतो. त्यामुळेच कर्तव्यालाच देव मानून त्याची पुजा करा.

काहीतरी नवीन करत जाणे हे यशस्वीपणाचे लक्षण असते. यशाच्या मार्गावर चालायचे असेल तर, आहे त्यातच समाधानी न राहता काहीतरी नव्याने सुरुवात करा आणि जीवन सुंदर बनवा.

# चुकांपासून धडा घ्या.

मनुष्याच्या हातून चुका या होतच असतात .हा नैसर्गिक नियमच आहे . एकही चुक न करणारा कोणी असूच शकत नाही .आणि चुका न करणारा हा मनुष्य असूच शकत नाही असे एक समीकरण आपण वाचतो. याबाबतीत आपणास दोन प्रकारचे लोक आढळतात एक म्हणजे जे कधीतरी चुका करतात आणि दुसरे ते जे वारंवार चुका करतात. पहिल्या प्रकारातील लोक हे त्या झालेल्या चुकीवर विचार, मनन करून ती चुक परत होणार नाही याकडे जाणीवपूर्वक लक्ष देतात.

किंबहुना त्या चुकीपासून काहीतरी शिकून त्यातून मार्ग काढतात. पण दुसऱ्या प्रकारातील लोक हे वारंवार चुका करून त्यामधील तिढा सोडविण्याचा प्रयत्न कधीच करत नाहीत. त्यामुळे झालेल्या चुकांमधुन त्यांना काहीच शिकण्यास मिळत नाही. इथे एक गोष्ट लक्षात घ्यावी लागेल चुका या सुधारण्यासाठी असतात, त्यामधून काहीतरी धडा घेवून आपल्या यशमार्गातील अडचण दूर करावी.

तुम्ही केलेली चूक ही सर्वस्वी तुमची चूक आहे आणि तुमचा पराजय हा सर्वस्वी तुमचा पराजय आहे कोणाला दोष देऊ नका. काहींच्या बाबतीत असे घडते की, हे तुझ्यामुळे झाले, हे काम मी व्यवस्थीत रित्या पूर्ण केले असते आपले अपयश आपण दुसऱ्यावर ढकलतो पण चुकीच्या बाबतीत असे करता येत नाही केलेली चूक ही आपणच केलेली असते.

त्यामुळे झालेल्या परिणामाचे खापर आपण दुसऱ्यावर फोडूच शकत नाही त्यामुळे आपल्या हातून चूक झाली तर झाली पण चूक होण्यामागे काय कारण असावे. आपले कोठे चुकले, एकच चुक आपणाकडून वारंवार

का घडते आहे याचा अभ्यास प्रत्येकाने केला पाहिजे. असे म्हणतात कि, चुका झाल्याशिवाय मनुष्य सुधारत नाही. पण हे कधी ज्यावेळी झालेल्या चुकांपासून तुम्ही काहीतरी धडा घेतला गेल्यावर.

चुका करणे हा काही गुन्हा नाही पण एकच चुक वारंवार करणे म्हणजे एक प्रकारचा गुन्हाच होईल म्हणून चुका टाळा आणि आपल्या कामात एकसुत्रता आणा चुका सुणारणे हे माणसाच्या प्रगतीचे लक्षण आहे. चुका सुधारण्यामध्ये माणसाकडे एक प्रकारची क्षमता असावी लागते ती म्हणजे निरिक्षण क्षमता म्हणजे झालेल्या चुकीचे व्यवस्थीत निरिक्षण करून त्यामधून काहीतरी मार्ग काढला पाहिजे जेणेकरून त्यापासून काहीतरी धडा घेतला पाहिजे.

झालेली प्रत्येक चुक ही आपणास काहीतरी सुचित करत असते. त्यामुळे त्यापासून काहीतरी शिकून जीवन जगत राहा.

# सदैव प्रतिक्षेत राहा

दोन-तीन दिवसापूर्वीची गोष्ट. दोन तरुणांमध्ये चाललेला संवाद मी ऐकला. त्यामधील एक दुसऱ्याला म्हणत होता, 'ज्यावेळी माझी वेळ येईल, त्यावेळी बघ मी कोठे असेन' हे वाक्य ऐकताच मी काहीसा थांबलो आणि वेळ या शब्दाला मनातच अधोरेखीत करुन पुढे गेलो. खरचं आजचा युवक त्याची वेळ येईपर्यंत वाट पाहतो का? किंवा येणाऱ्या संधीच्या प्रतिक्षेत तो असतो का? याचेच उदाहरण घ्यावयाचे झाले तर व्यवसाय आणि नोकरी यामध्ये सापडलेल्या तरूणाचे उदाहरण घेता येईल.

आपणास नोकरी लागत नाही म्हणून व्यवसाय सुरू करणे आणि व्यवसायात जम बसेना म्हणून पुन्हा नोकरीच्या मागे लागणे, यामुळे ना नोकरी, ना व्यवसाय अशी त्याची स्थिती होते. किंबहुना आपणास नोकरी का लागत नाही किंवा आपण व्यवसायात का स्थिर होत नाही. याची कारणे शोधून जोवर तोडगा निघत नाही, तोपर्यंत त्या नोकरीच्या किंवा व्यवसायाच्या प्रतिक्षेत राहणे हेच यशाचे खरे गमक आहे.

संधी कधी दार ठोटावते हे सांगता येत नाही आणि मिळालेली संधी एकदा गेली की परत मिळत नाही. पण त्यासाठी करावी लागणारी प्रतिक्षा मात्र आपल्या अंगी बिंबवावी लागेल. तरच त्यासंधीचा फायदा होईल. हिंदीमध्ये एक म्हण आहे, 'सब्र का फल मिठा होता है' या म्हणीनुसार कोणतीही वेळाने मिळणारी गोष्ट ही शेवटपर्यंत टिकणारी व आपल्या मनाप्रमाणे घडलेली असते. पण ती  आपणास मिळेपर्यंत जो

मधला काळ असतो, तो मात्र सोसण्याची हिंमत आपणामध्ये असायला हवी. एखाद्या पुलावरून जाताना पुलाचे दुसरे टोक गाठण्यासाठी पुलाच्या मधल्या मार्गावरून आपणास जावचं लागतं. तरच तुम्ही ते टोक गाठू शकता. पण प्रतिक्षा न करता तुमचा प्रवास मध्येच थांबवला तर तुम्ही कधीच पुलाचे दुसरे टोक गाठू शकणार नाही. म्हणून तर सदैव प्रतिक्षेत राहणं हाच यशाच्या मार्गातील महत्त्वाचा टप्पा आहे.

चांगल्या गोष्टींसाठी वेळ पाहण्याची किंवा ध्येय साध्य करताना प्रतिक्षा करीत राहण्याची सवय अंगी लावून घ्या. येणारी प्रत्येक वेळ ही तुमच्यासाठी आहे. म्हणून तर सदैव प्रतिक्षेत राहा.

# सुट्टी - एक संधी काहीतरी नवं शिकण्याची

आठवडाभर सतत कामात असणाऱ्या एखाद्या इसमापुढे फक्त सुट्टी या शब्दाचा उच्चार जरी केला तर त्याचा चेहरा आनंदाने फुलून येतो आणि हे साहजिकच आहे. कारण विश्रांती ही मनुष्याची एक गरज आहे. त्यामुळे मिळालेली सुट्टी ही प्रत्येकजण आनंदाने उपभोगतोच. रविवार हा सुट्टीचा दिवस ठरलेला आहे. या दिवशी शासकीय ऑफिस, शाळा, कॉलेज इ .बंद असतात. मग काय, आदल्या दिवशी प्लॅनिंगला सुरूवात. यामध्ये दिवसभर घरामध्ये बसून चॅनेल सर्चिंग करणारे व ट्रिपला जाणारे लोक आढळतात. पण यामुळे होतो तो फक्त टाईमपास, नवं काहीच नाही.

आठवड्याभराचा रूट प्रत्येकाचा ठरलेला असतो. त्या रुटिंगमध्ये काहीही बदल होत नाही. फक्त काम एके काम. आपण इतरत्र पाहत सुध्दा नाही. त्यामुळे नवं काहीतरी करण्याची किंवा शिकण्याची संधी मिळतच नाही. म्हणून तर काहीतरी नवं शिकण्याची एक संधी म्हणून प्रत्येकाने सुट्टीकडे पाहिले पाहिजे. प्रत्येकाने सुट्टीच्या दिवसाचे नियोजन केले पाहिजे. या नियोजनामध्ये विश्रांतीला किती वेळ द्यावा. आवडी-निवडीसाठी किती वेळ द्यावा त्याचे एक नियोजन असावे.

प्रत्येकाचे काही ना काही छंद असतातच. हे छंद जोपासण्याबरोबरच आपणाला नवं काहीतरी शिकता येईल का? याचा शोध घेतला पाहिजे. एक विचार करा की, प्रत्येकाने आपल्या सुट्टीच्या दिवसामध्ये एक गोष्ट काही तरी नवीन शिकली तर अशा किती सुट्ट्या आपण भोगतो,

याच्यावरून हे समजते की, किती गोष्टी आपण सुट्टीमुळे आत्मसात करू शकतो. आपले ज्ञान वाढवू शकतो. म्हणून तर सुट्टीला रिकामा वेळ न समजता नवीन शिकण्यासाठी मिळालेला वेळ समजा तरच नव-नविन ज्ञान आत्मसात कराल.

अनेकांना एक प्रश्न नेहमी पडतो कि, सुट्टीच्या दिवशी काय करायचे? पण असा डोक्यात विचार आणण्यापेक्षा आजच्या सुट्टीच्या दिवशी काय-काय नवीन गोष्टी करायच्या किंवा शिकायच्या याचा विचार करा. एखाद्या गोष्टीमध्ये आपण अज्ञानी आहोत. त्याचे ज्ञान घेण्याचा प्रयत्न करा, लिखाण-वाचनावर भर द्या, आपला छंद जोपासा म्हणजे नव काहीतरी शिका. मग पहा की, सुट्टीचा वेळ कधी निघून गेला हे समजणारसुध्दा नाही.

विद्यार्थी मित्रांसाठी तर सुट्टी खूप महत्त्वाची आहे. कारण शाळेच्या व्यापामधून अन्य काहीतरी शिकण्याची मुभा त्यांना मिळते, त्याचा नक्की फायदा करून घ्या व मिळालेली सुट्टी सत्कारणी लावा.

# नवी संधी

जीवन जगत असतांना प्रत्येकाला कुठल्याना कुठल्या क्षेत्रात नवी संधी मिळतच असते. पण त्या मिळालेल्या संधीचे सोने करायचे की काही फुरसट विचाराने ती संधी गमवायची हे सर्वस्वी आपल्याच हातामध्ये असते. प्रत्येकाची विचार पातळी भिन्न असते. काहीजण होणा-या परिणामाचा विचार न करता प्रत्येक क्षेत्रात पाऊल टाकतात तर काही लोक परिणामाला घाबरुन मिळालेली संधी सोडून देतात. इथे दोघांचा विचार सुध्दा बरोबर आहे. कारण नवी संधी मिळाली म्हणून त्याच्या मागचा अभ्यास न करता ती संधी प्राप्त करुन नुकसान करुन घेतलेले लोक सुध्दा आढळतात किंबहुना संधी स्विकारल्या नंतर काय परिणाम होणार आहेत हे पडताळून पाहून ती संधी नाकारणारे सुध्दा लोक आहेत. म्हणून मिळालेली नवीन संधी प्राप्त करायची कि गमवायची ही एक तारेवरची कसरतच म्हणावी लागेल.

इथे एक विचार मांडावासा वाटतो कुठल्याही क्षेत्रात जबाबदारीला खुप महत्व असते. याचेच उदाहरण घ्यावयाचे झाले तर एखादी महत्वाची जबाबदारी एखादयाला दयावयाची असेल तर त्याच्या मागे त्यांच्या वैचारीक पातळीचा प्रामुख्याने विचार केला जातो. त्याचे विचार सकारात्मक आहेत की नकारात्मक आहेत. ती व्यक्ती जबाबदार व्यक्ती आहे का याचा सारासार विचार करुन त्याच्यावर जबाबदारी सापविली जाते. म्हणजेच काय एकंदरीत नवी संधी ज्यांच्यावर सोपविली जाते त्या व्यक्तीमत्वाचा विचार होतो.

जेव्हा एखादी नवी संधी आपणास मिळते तेव्हा संधीचे नेहमी स्वागतच करावे ,काय माहिती ती संधी आपल्या आयुष्याचे सोनं करेल. पण संधी

मिळाली म्हणजे आपण त्या क्षेत्रात पारंगत झालो असा याचा अर्थ होत नाही. मिळालेल्या क्षेत्रातील नवी संधी म्हणजे आपली ती एक प्रकारची परिक्षाच असते. आणि परिक्षेला नेहमी अभ्यास करुनच जावे लागते. म्हणून ती संधी कोणती आहे याचा प्रथम विचार करा, मग ती संधी आत्मसात करायची कि नाही हे ठरवा.

अनेक महान व्यक्तीना सुध्दा त्यांच्या क्षेत्रामध्ये ज्यावेळी नवी संधी मिळाली तेव्हा त्यांनी संधीचा फायदा उठवला म्हणून ते यशस्वी झाले पण फक्त संधी लाभली म्हणून ते यशस्वी झाले. असा याचा अर्थ होत नाही. त्या संधी मागची त्यांची प्रामाणिकता व त्या संधीला त्यांनी दिलेली पराकष्टाची दाद यामुळेच ते लोक मिळालेल्या नव्या संधीच्या जोरावर यशाची शिखरे पार केली.

कुणाच्या जीवनात कधी व कुठली संधी येईल हे सांगता येत नाही. त्यामुळे मिळालेल्या संधीला नाकारु नका. पण त्याचा थोडा विचार मात्र नक्की करा. आणि ती संधी स्विकारुन आपल्यामध्ये असलेले कौशल्य दाखवून प्रगती करा.

# आळस प्रगतीच्या मार्गातील गतीरोधक

शालेय जीवनात असताना बाईंनी सांगितलेली ससा व कासवाची गोष्ट ही प्रत्येकाला आठवतच असेल. समानध्येय डोळयापुढे असणाऱ्या ससा व कासवाची शर्यत जेव्हा सुरू होते, तेव्हा कासव आपल्या हळूवार चालीने ध्येयाकडे वाटचाल करतो.

पण ससा मात्र असा विचार करतो की, आपणाला भरपूर गती आहे. त्यामुळे आपण बरेच अंतर जावू व थोडी विश्रांती घेवू. मग काय जीत ही आपलीच. परंतू गोष्टीच्या शेवटी जीत ही कासवाचीच झालेली आहे. हे आपणाला माहितच आहे. ससा हरतो तो त्याच्या आळशी वृत्तीमुळे.

जीवन म्हणजे सुध्दा एक प्रकारची शर्यतच आहे. कोणी जर सशाप्रमाणे विचार करीत असेल तर मात्र त्याला हार ही पचवावीच लागेल. शाळेमध्ये आपण नेहमी फलकावर सुविचार वाचायचो, 'आळस हा माणसाचा खरा शत्रु आहे'. पण या घडीला विचार केला तर आळस तर प्रत्येकाचा मित्रच झालेला आहे. पण तो धोकादायक मित्र आहे. याचा विचारच आपण कोणी करीत नाही. म्हणून कुठे ना कुठे तरी आपण मागे राहतो.

हिंदीमध्ये एक म्हण आहे - 'कल करे सो आज कर, आज करे सो अब, पल पल में परलय होएगी, बहुरी करोगे कब' बऱ्याच वेळा आपण उद्या करु, नंतर करु, करणार आहे, या उद्या, नंतर या शब्दांच्या दुनियेमध्ये वावरत

असतो. कारण आपल्यामध्ये भरलेला आळस. उद्याचे काम आज व आजचे काम आता या सूत्राप्रमाणे जर गेले तर यशनिश्चिती हमखास तुमचीच आहे.

अपवाद वगळता माणसाला विश्रांतीची गरज असते. पण हीच विश्रांती प्रगतीच्या मार्गातील गतिरोधक होणार नाही. याची खबरदारी आज प्रत्येकाने घेण्याची गरज निर्माण झालेली आहे. 21 व्या शतकात वावरताना विद्यार्थी वर्गाला तर खूप जागृत राहण्याची आवश्यकता आहे. शिक्षण क्षेत्रात होणारे नव-नवे बदल, नवीन तंत्रज्ञान, प्रशिक्षण अभ्यास, यामध्ये जर सदैव तत्पर राहायचे असेल तर आळस या शत्रुला शत्रुच मानले पाहिजे आणि त्याला थोडं आपणांपासून दूर करून सदैव जागृत राहिले पाहिजे तरच हा गतिरोधक आपणांपासून दूर होईल.

नेहमी कार्यतत्पर राहिले पाहिजे. आपल्या कामाला महत्त्व देवून ते पूर्ण केले पाहिजे. स्वतःला घडविण्यात इतका वेळ खर्च करावा की दुसरे काही करण्यास वेळच मिळू नये. आळसाला दूर ठेवा व प्रगतीचा मार्ग नेहमी खुला ठेवा.

# न्यूनगंड: एक शाप

"जीवन मे एक बार जो फैसला कर लिया तो फिर पीछे मुडकर मत देखो, क्यों की ...पलट पलट कर देखने वाले इतिहास नही बनाते". आपल्याला सर्वच गोष्टी साध्य व्हाव्यात हा प्रत्येकाचा मानस असतो. जीवन जगत असताना प्रत्येकजण काही ना काही ज्ञानार्जन करीतच असतो ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. पण जे ज्ञान आपण जाणून-बुजून घेत असतो, अशा ज्ञानार्जनाला सकारात्मक मानसिकता असणे गरजेचे असते. एखादी गोष्ट आपणाला आलीच पाहिजे. ती कोणत्याही परिस्थितीत आपणांस मिळवावी लागणारच आहे. अशा परिस्थितीमध्ये मनाची द्विधावस्था निर्माण होते. मनात अनेक विचार निर्माण होतात. ती गोष्ट आपणास येईल कि नाही? त्या गोष्टीमध्ये आपण पारंगत होतो कि नाही? ती गोष्ट आपल्या हातून होईल कि नाही? अशा अनेक प्रश्नाचे सावट आपल्या मनामध्ये तयार होते. म्हणजेच त्या गोष्टीबद्दल आपल्या मनामध्ये न्यूनगंड निर्माण होते. नकारार्थी विचारच आपले पाय ओढत असतात, अशा विचाराने आपली कामे रेंगाळतात, एकंदरीत मनातील न्यूनगंड हा एक प्रकारचा शापच म्हणावा लागेल. न्यूनगंडाने मनुष्य अप्रगतशील बनतो, अकार्यक्षम बनतो. कोणत्याही क्षेत्रात यश संपादन करावयाचे असेल तर त्याबद्दलची भिती मनामधून काढून टाकली पाहिजे. त्याबद्दल मनामध्ये न्युनगंड न बाळगता सकारात्मकता ठेवली पाहिजे. खालील काही गोष्टी मनातील न्युनगंड घालविण्यास उपयोगी पडतील.

**सकारात्मक विचार करा-** अमुक ही गोष्ट मी करू शकणार नाही किंवा ती गोष्ट माझ्या हातून होणार नाही अशी न्यूनगंडाची भावना मनातून काढून टाका. ती गोष्ट मी करू शकतो किंवा करण्याचा मी मनापासून प्रयत्न करीन अशी सकारात्मक वृत्ती मनामध्ये ठेवा. नेहमी सकारात्मक विचारांचा पुरस्कार करा.अशाने तुम्ही ध्येयवादी बनाल.

**मनपूर्वक काम करा -** कोणतेही काम करीत असताना मनपूर्वक करा. एखाद्या कामात अपयश आले तर त्याची भिती मनामध्ये ठेवू नका. **'अपयशाच्या खडकाखाली यशाचा झरा पाझरत असतो'** याप्रमाणे पुन्हा पुन्हा प्रयत्न करीत रहा. अशाने तुमची न्यूनगंडाची भावना नाहीशी होईल व तुमची सकारात्मकता वाढेल आणि ते कार्य पूर्णत्वास जाईल.

**प्रत्येक गोष्टीकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदला** -एखाद्या गोष्टीकडे आपण ज्या नरजेने पाहतो, त्यादृष्टीने ते कार्य घडत असते. नकारार्थी नजरेने पाहिले तर त्या कार्यात नकारच निर्माण होतो. याउलट सकारात्मक दृष्टीने पाहिले तर त्या कामाची यशस्वीता वाढते. त्यामुळे आपला पाहण्याचा दृष्टीकोन बदला.

**कामातील अचूकपणा वाढवा** -एखादे काम करीत असताना त्यामधील अचूकपणा वाढवा. काम अचूकरित्या पूर्ण करण्याचा तंतोतंत प्रयत्न करा. कामातील वारंवार होणारा चूकपणा मनामध्ये न्यूनगंड निर्माण करीत असतो. त्यामुळे अचूकपणा वाढवा.

**विचारशक्ती वाढवा .-** विचार करीत असताना सखोल विचार करा . त्यातील सत्यता पडताळून पहा. विचाराने मनुष्य सुधारतो. चांगल्या

विचाराने वाईट विचारांचा नाश होतो. 'भित्या पोठी ब्रम्हराक्षस' या म्हणीनुसार कोणत्याही गोष्टीची भिती किंवा त्या गोष्टीबद्दल न्यूनगंड जर मनामध्ये बाळगलात तर घडणारी गोष्ट घडण्यास अडचण निर्माण होते. त्यामुळे न्यूनगंड न बाळगता किंवा मनामध्ये भिती न बाळगता कोणत्याही गोष्टीला धैर्याने सामोरे जा...

# समजावून घ्या

देशाची एक बळकट शक्ती म्हणून आज युवकवर्गाकडे पाहिले जाते. ‘देशातील युवक सक्षम तर देश सक्षम’ आज समाजात अनेक संस्था, खासगी दुरदर्शन वाहिन्या, युवा वर्गासाठी काहीतरी अनोखा प्रोजेक्ट सादर करत आहेत. युवावर्ग एकवटावा आणि त्यांच्याहातून देशसेवेचे काहीतरी कार्य तडीस जावे त्याचबरोबर समाजात आणि कुटुंबात वावरत असताना जबाबदारी या गोष्टीचे महत्व त्यांच्यामध्ये येणे महत्वाचे आहे.

आज तरुणांमधून समजूतदारपणा कोठेतरी नाहीसा झालेला दिसतो आहे. मी एक समजूतदार व्यक्ती आहे असे ठामपणे आज कोणीही सांगू शकत नाही. याचे प्रमुख कारण म्हणजे समजावून घेण्याच्या प्रक्रियेपासून तरूण दुर जात आहे. कोठेतरी संभाषण प्रक्रिया संपत जाते आहे की काय? ही भिती प्रत्येकाच्या मनात घर करुन आहे. आपण कुटुंबात असताना एक कुटुंबातील सदस्य आहोत व समाजात वावरताना समाजातील एक महत्वाचा घटक आहोत हि भावना मनी बाळगूण युवकांनी जगले पाहिजे.

तरुणांनी सगळयात महत्वाचा एक गुण अंगी बिंबवावा तो म्हणजे समजूतदारपणा या गुणामुळे तो यशस्वीपणाची पाऊले तर चालतोच किंबहुना आपण या गुणामुळे सर्वांना समजावून घेवून जावू शकतो हा आत्मविश्वास त्यांच्या मनात तयार होण्यास त्याला मदत होईल. एक जबाबदार व्यक्ती म्हणून प्रत्येकाला समजावून घ्या. कुटुंबातील प्रत्येक

व्यक्तीला व समाजातील व्यक्तींना समजावून. घ्या तरच कोठेतरी एकमेकाला दोष देण्याच्या वाईट सवयीपासून सर्वांना मुक्ती मिळेल.

दोन व्यक्तीमध्ये जर काही कलह निर्माण झाला तर आजुबाजूचा म्हणतो तुच दोन पाऊले माघार घे. पण येथे माघार घे म्हणजे शरणागती पत्कार असा अर्थ येथे अपेक्षित नसतो तर वाद वाढविण्यापेक्षा तू समजावून घे. ज्यावेळी तुम्ही युवावर्गात प्रवेश करता तेव्हापासून तुम्ही जबाबदारीच्या सिमेजवळ पोहचलेले असता प्रसंगी आपणापेक्षा वयाने लहान असणाऱ्या किंवा मोठ्या असणाऱ्या प्रत्येकाला समजावून घ्या आणि मग पहा तुमच्या आयुष्यात कलह किंवा दोष या गोष्टीला काही महत्व नसेल आणि तुम्ही असाल एक समजावून घेणारी व्यक्ती.

जीवन हे एकदाच मिळते त्यामुळे प्रत्येकाला आपलसं करुन काही चुकीवर पाणी टाकून प्रत्येकाला समजावून घ्या आणि मग पहा तुमचे जीवन किती आनंदी होते.